**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु**

२. आता पी.आर नं ५२/५४ वरील पाकीटात असलेले पेनड्राइव्ह चालु करण्यात आले. त्यामध्ये ch0520221009130000.mp4 अशी फाईल आहे. ती सुरु केली असता त्यामध्ये ०९.१०.२०२२ अशी तारीख दिसत असुन Sun असे नमुद असल्याचे दिसत आहे. सदर सी.सी.टीव्ही फुटेज हे कॅमेरा नं ५ चे असल्याबाबत दिसत आहे. सदर फुटेज एकुण २५.५९ मिनिटांचा दिसत आहे. फुटेज मध्ये वेळ ही नमुद करण्यात आलेली आहे व ती १३.००.००असे नमुद आहे. फुटेज मध्ये कपडयांचे दुकान दिसुन येत आहे व त्यामध्ये एक इसम काळया रंगाचा शर्ट घातलेला दिसुन येत असुन मोबाईलवर काही पहात आहे. काउंटरवर बरेच जिन्सच्या पॅंट टाकलेल्या दिसुन येत आहे. फुटेज व्यवस्थीत दिसत आहे. १.२८ मिनीटांनी दुकानात एक इसम आल्याचे दिसुन येत आहे व दुकानात बसलेला माणुस बाहेर गेल्याचे दिसुन येत आहे. बाहेरुन आलेला माणुस कपडयांची घडी घालुन आत ठेवत आहे. त्यानंतर तो माणुस मोबाईल पहात असल्याचे दिसुन येत आहे.

३. आता पी.आर नं ५२/५४ वरील पाकीटात असलेले दुसरे पेनड्राइव्ह चालु करण्यात आले. त्यामध्ये ch1620221009140000.mp4 अशी फाईल आहे. ती सुरु केली असता त्यामध्ये ०९.१०.२०२२ अशी तारीख दिसत असुन Sun असे नमुद असल्याचे दिसत आहे. सदर सी.सी.टीव्ही फुटेज हे कॅमेरा नं १६ चे असल्याबाबत दिसत आहे. सदर फुटेज एकुण ४०.४९ मिनिटांचा दिसत आहे. फुटेज मध्ये वेळ ही नमुद करण्यात आलेली आहे व ती १४.००.००असे नमुद आहे. फुटेज मध्ये कपडयांचे दुकान दिसुन येत आहे व प्रामुख्याने बिलकाउंटर दिसुन येत आहे. बिलकाउंटरच्या आजुबाजुला माणसं दिसुन येत नाही. परंतु माणसं येण्याजाण्याची हालचाल दिसत आहे. साधारण २१.३० मिनीटांनी सहा इसम आल्याचे दिसुन येत आहे.

४. साक्षीदार क्र.१ ला फुटेज दाखविण्यात आले. साक्षीदार सांगते की त्या फुटेज मधील माणसांना मी ओळखु शकत नाही.

**सरतपास पुर्ण .**

**उलटतपास आरोपी क्र. १ ते ३ तर्फे विधिज्ञ श्री. पी.बी औताडे यांचेकडून**

५. माझे नववी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मला लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की न्यायालयात काय सांगायचे आहे ते मला पांडुरंग याने सांगितले. हे म्हणणे खरे आहे की पांडुरंग माझ्या सोबत प्रत्येक तारखेला येतो आजही तो माझ्या सोबत आलेला आहे.

६.		मी शेती करते. मला २१ एकर शेती आहे. त्यातला १३ एकर शेतीचा वाद होता.सर्व निकाल माझ्या बाजुने लागलेला आहे. माझी पुर्ण २१ एकर शेती वडीलोपार्जीत आहे. सदरची जमीन विलास होनच्या नावावर आहे.

**प्रश्न –** तुमच्या कुटुंबाच्या नावावर ७/१२ उता–यामध्ये जमिन आहे का

**उत्तर** – आजा सास–याच्या नावावर आहे. माझ्या सास–यांचे नाव शंकर अप्पा बिडगर आहे.

७.		माझ्या आजा सास–यांच्या नावावर २१ एकर शेती होती. सदर शेती वांगी गट नं ३५ मध्ये आहे. मला लिहिता वाचता येते आता मला गट नं ३५ चा उतारा दाखविण्यात आला. साक्षीदार सांगते की मला चष्मा असल्याने बारीक अक्षर दिसत नाही. आता मी चेष्मा आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं ३५ चे एकुण क्षेत्र पोटखराबा वजा जाता १५ एकर ४ गुंठे आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे आजा सासरे शंकर अप्पा बिडगर यांच्या नावे ६ एकर ५ गुंठे एवढे क्षेत्र आहे.  हे म्हणणे खरे नाही की आजा सासरे शंकर अप्पा बिडगर यांच्या नावे गट नं ३५ मध्ये २१ एकर क्षेत्र नाही.  हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ मध्ये नागरमल सुरजमल आगरवाल यांच्या नावे अर्धा एकर २० गुंठे क्षेत्र आहे.

**प्रश्न –** गट नं ३५ च्या ७/१२ उता–यावर विलास भाउसाहेब होन यांच्या नावे २ हेक्टर ३७ आर एवढी जमीन आहे.

**उत्तर –** त्यांचा व आमचा वाद होता.

**प्रश्न –** गट नं ३५ च्या ७/१२ उता–यावर भारत आसाराम बिडगर यांच्या नावे १ एकर १ गुंठा एवढी जमीन आहे.

**उत्तर** – आहे, पण क्षेत्र सांगता येणार नाही.

**प्रश्न –** गट नं ३५ च्या ७/१२ उता–यावर शरद भाउसाहेब बिडगर यांच्या नावे दिड एकर एवढी जमीन आहे.

**उत्तर –** आहे, पण क्षेत्र सांगता येणार नाही.

**प्रश्न –** गट नं ३५ च्या ७/१२ उता–यावर गणेश मोहन बिडगर यांच्या नावे दिड एकर एवढी जमीन आहे.

**उत्तर –**  आहे, पण क्षेत्र सांगता येणार नाही.

८.		हे म्हणणे खरे नाही की नागरमल व विलास होन यांची जमीन अरुण रफायल पाटोळे हा कसतो.  हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ बिडगर व बाजीराव ठोंबरे यांची जमीन अरुण रफायल पाटोळे आता बटाईने करतात व सुभाष अप्पासाहेब पटारे यांच्या ट्रॅक्टरने नवनाथ बिडगर व बाजीराव ठोंबरे हे जमीन करतात. हे म्हणणे खरे नाही की, सुभाष अप्पासाहेब पटारे यांच्या

ट्रॅक्टरवर सनी बारसे हा ड्रायव्हर आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की पटारे यांचा ट्रॅक्टरच नाही.

**९.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.१०.२०२२ रोजी सकाळी ९.३० वा.सुभाष अप्पासाहेब पटारे यांचा ट्रॅक्टर घेवून आरोपी क्र. १ नांगरण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, अमोल केशव बिडगर व लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांनी आरोपी क्र. १ नांगरण्यासाठी आले असता ट्रॅक्टर अडवला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला जातीवाचक शिवीगाळ करुन 'येथे नांगरायचे नाही ' असे धमकवण्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की ,' कारे,महारडया या अगोदर मारलेले बास झाले नाही का' असे आरोपी क्र.१ ला धमकवण्यात आहे.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, अमोल केशव बिडगर व लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांनी आरोपी क्र. १ ला लाकडी दांडयाने मारहाण केली. साक्षीदार स्वतःहुन सांगते की आरोपी जमिनीतच आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सुभाष पटारे, अंकुश पटारे हे तेथे आले व आरोपी क्र. १ ला मुलांच्या ताब्यातुन सोडविले.

**११.** हे मला सांगता येणार नाही की, सनी बारसे (आरोपी क्र.१) याने अमोल केशव बिडगर व लक्ष्मण केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर यांच्या विरोधात जातीवाचक शिवीगाळ करण्यासंबंधी ३८७/२०२२ हा गुन्हा दाखल केलेला आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, सनी बारसे (आरोपी क्र.१) याला ५.०६.२०२१ रोजी अमोल केशव बिडगर व पती केशव बिडगर, पांडुरंग केशव बिडगर, लक्ष्मण केशव बिडगर व मी वांगी बु येथे तो चालला असताना त्याला मारहाण केली व त्याची चेन काढून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने त्या अनुषंगाने गु.र.नं। १५९/२०२१ भा.दं.वि ३९५,५०४,५०६ सह ३४ या कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, गु.र.नं। १५९/२०२१ मागे घेण्यासाठी आरोपी क्र.१ ला नेहमी धमकी देत होते. हे मला सांगता येणार नाही की १८.८.२०२१ रोजी आरोपी क्र.१ ने धमकी देण्यासंदर्भात आमच्या विरुध्द गुन्हा दाखल केला.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, गट नं ३५ च्या कडेला चारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ९.१०.२०२२ रोजी आरोपी क्र. १ ने फिर्याद दिली म्हणुन मी व माझे कुटुंब ट्रॅक्टर मध्ये बसुन चारीच्या कडेने चाललो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस सदर ट्रॅक्टर चारीमध्ये गेल्यावर पलटी झाला व त्यामुळे मला व माझ्या पतीला व मुलांना मार लागला.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ९.१०.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास शेतात होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं ३५ मध्ये माझे २१ एकर क्षेत्र आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी क्र. ४,५ यांनी मला 'आम्ही विलास होन यांच्याकडून शेती घेतली आहे व १३ एकर शेती मधील ६ एकर आम्हाला दे नाहीतर जिवे मारु 'अशी धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्यावेळी रहात्या घरी मक्याचे खळे काढत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ च्या हातात लोखंडी पहार होती व आरोपी क्र. २ च्या हातात कु–हाड होती व आरोपी क्र. २ ने माझा अमोलच्या पायावर कु–हाड मारली व त्याचा पाय मोडला असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ने पांडुरंग याच्या डोक्यावर पहार मारायला घेतली असता त्यावेळी मी हात मधी घातला असता माझ्या बोटांना पहार लागली व त्यामुळे माझी दोन बोटं मोडली हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने ११२ क्रमांकावर फोन केला व त्यानंतर पोलिस तेथे आले. हे म्हणणे खरे नाही की,आरोपी नं ४ व ५ यांनी आम्ही दवाखान्यात असताना जमीन नांगरली व आमच्या वाहनांची, भांडयांची तोडतोफ केली हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामध्ये माझ्या गळयातीत सोन्याचे मंगळसुत्र व माझ्या सुनेचे छोटे गंठण गहाळ झाले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व २ ने माझ्या मुलाचे पांडुरंगाचे केस कापले.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांना आम्ही आर्टिकल अ वरील पहार, लाकडी दांडा व कु–हाड दिलेले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की त्यावेळेस आम्ही दवाखान्यात होतो. पोलिसांनी घटनास्थळावरुन घेतले. हे मला माहित नाही की आर्टिकल अ वरील पहार, लाकडी दांडा व कु–हाड भंगारच्या दुकानात सहज मिळते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने आमच्या विरुध्द केस दाखल केली होती त्या मागे घेण्याकरीता खोटी केस दाखल केली व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती.....**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2025.07.24 13:38:29 +0530

**(व्ही.एन.काटकर)**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

**दिनांक –२३.०७.२०२५** **न्यायालय क्र.४, श्रीरामपूर.**